## तुझेच क्षण

तुला पाहणे, तुला जाणणे
तुझ्या आठवी मन रमणे,
तुला स्पर्शता कल्पनेतही..
सांग कसे हे तन फुलणे ?

मोहरते, कधी बावरते,
मन वेडे अन कसे भुलते?
विसरून अवघी दुनियादारी...
स्वप्नझुल्यावर बघ झुलते !!

कसे साठवू, किती आठवू..
तुझेच क्षण जे, तुला गाठवू?
माझ्यात दडल्या तुझ्या मनाला..
आर्त भावना कशी पाठवू ?

**- प्रीती देशपांडे**

**http://www.meetipreeti.com**